


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३४२ वा | सोमवार दि १३ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मोठ्या पक्षाकडून सत्तेतल्या मित्रांचीच शिकार होणार, रोहित पवार यांचा दावा, श्रीकांत शिंदेंचं जोरदार प्रत्युत्तर...

**वृत्तसंस्था/ पुणे**

भाजप आणि मित्रपक्षांबाबत सूचक इशारा देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर देत टोला लगावला आहे. त्यांनी त्यांच्या पक्षाचा विचार करावा, आमच्याबद्दल काळजी करण्याची गरज नाही,फक्त असे स्पष्ट शब्दांत श्रीकांत शिंदेंनी म्हटले. पुण्यात माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे यांनी ही प्रतिक्रिया दिली. रोहित पवार यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये भाजप भविष्यात मित्रपक्षांचीच शिकार करेल, असा दावा केला होता. या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात चर्चा रंगल्या होत्या. या पार्श्वभूमीवर श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला थेट उत्तर देत सांगितले की, प्रत्येक पक्ष आपली ताकद वाढवण्यासाठी काम करत असतो. आम्हीही आमच्या पक्षाच्या संघटनावर लक्ष केंद्रीत केले आहे. बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहोत.फक्त त्यांनी स्पष्ट केले की, शिवसेनेत संघटन बळकट करण्यासाठी नियोजनबद्ध काम सुरू आहे आणि त्यासाठी अशा बैठका सातत्याने घेतल्या जाणार आहेत. रोहित पवार यांनी केलेल्या मित्रपक्षांची शिकार या विधानावर भाष्य करताना शिंदे यांनी विरोधकांना आपल्या पक्षातील



घडामोडींवर लक्ष देण्याचा सल्ला दिला. आमच्याबाबत चिंता करण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या पक्षात काय चाललंय ते पाहावं,फक्त असा थेट टोला त्यांनी रोहित पवार यांना लगावला. दरम्यान, श्रीकांत शिंदे म्हणाले की, पुढील तीन वर्षांत कोणत्याही निवडणुका नसल्यामुळे हा काळ संघटन मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वॉर्डनिहाय बैठका घेऊन कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचणार आहोत. मतदार निसटू नयेत यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाईल, असे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे प्रश्न ऐकून घेणे आणि पक्षाची बांधणी मजबूत करणे, हा या बैठकीमागील उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पंढरपूरच्या राजकारणात मोठा उलटफेर बघायाल मिळत आहे. भगीरथ भालके यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत भूमिका मांडली आहे. जशी भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली, तसेच भगीरथ भालके हे पंढरपूरात विकासाची गंगा नक्की आणतील. त्यांच्या प्रवेशामुळे पंढरपूर, मंगळवेढा आणि माढा परिसरात शिवसेनेची ताकद वाढणार असून भालके यांच्या खांद्यावरचा भगवा झेंडा हा फक्त शिवसेनेचा नसून तो भागवत धर्माचा, प्रभू श्रीरामांचा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या परंपरेचा आहे. अनिल सावंत आणि तानाजी सावंत यांचा उल्लेख करत काका-पुतण्याचे राजकारण महाराष्ट्राने पाहिले आहे, पण हे दोघे शिवसेनेत एकदिलाने काम करतील, असा विश्वास एकनाथ शिंदेंनी याप्रसंगी व्यक्त केला. ऑपरेशन टायगर वगैरे काही नाही. काही चॅनलवालेच डरकाळी फोडत आहेत. ती ऐकून काही जण म्याव-म्याव करत आहेत. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या तसेच वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांमुळे आणि भगव्याच्या शानमुळेच दररोज हजारो नेते लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेसोबत जोडले जात आहेत, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

---

# उद्धवजींनी माझं कौतुक केलं, बैठकीत ऑपरेशन टायगर असा विषय नव्हता मातोश्रीतील बैठकीनंतर खासदार अरविंद सावंत काय म्हणाले?

**वृत्तसंस्था/मुंबई**

शिवसेना (ठाकरे गट) अंतर्गत सुरू असलेल्या घडामोडींना आणखी वेग आला असून ऑपरेशन टायगरच्या पार्श्वभूमीवर खासदार अरविंद सावंत यांनी आज मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. अलीकडे काही मीडिया रिपोर्ट्समध्ये सावंत यांच्यासह काही खासदारांची नावे प्रसिद्ध झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. तसेच संबंधित वृत्तपत्रांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबतही या बैठकीत भूमिका ठरवण्यात आल्याची माहिती आहे. सावंत यांनी यापूर्वीच अशा वृत्तांविरोधात कायदेशीर नोटीस देण्याचा इशारा दिला होता. दरम्यान, महत्त्वाच्या चर्चेनंतर सावंत हे मातोश्रीमधून बाहेर पडले असून त्यांनी माध्यमांशी संवाद साधत आपली स्पष्ट भूमिका मांडली. या संपूर्ण प्रकरणावर आता अरविंद सावंत कायदेशीर नोटीस बजावण्याच्या तयारीत असून, सोमवारी न्यायालयात धाव घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. अरविंद सावंत म्हणाले की, मातोश्रीवर झालेली बैठक ही भारतीय कामगार सेना आणि पक्षाच्या संघटनात्मक कामाबद्दल होती. मी दररोज मातोश्रीवर जातो, तिथे माझा वावर असतो. उद्धवजींनी उलट माझे कौतुक केले आणि अभिनंदन केले. ज्या बातम्या पसरवल्या गेल्या, त्या केवळ विकाऊ पत्रकारितेचा नमुना आहेत. जे घडलेच नाही, ते घडले असे भासवले जात आहे, असा टोला त्यांनी लगावला. लेखी खुलासा देण्याच्या मुद्द्यावर बोलताना ते म्हणाले की, आम्ही बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत, जे बोलतो ते ठामपणे बोलतो. पण माध्यमांनी वेगळा अर्थ काढू नये, म्हणून मी स्पष्ट भूमिका मांडली. पुढे बोलताना सावंत म्हणाले की, सरकार विकासकामांत भेदभाव करत आहे. मी दक्षिण मुंबईचा खासदार असूनही, एका साध्या कार्यकर्त्याला किंवा माजी खासदाराला राहुल शेवाळेना ८-८ कोटींचा निधी दिला जातो, मग अनिल देसाई किंवा मला का डावलले जाते? निवडणूक संपली की आपण सर्वांचे बांधील असतो, हे शिवसेनाप्रमुखांचे विचार विद्यमान सरकार विसरले आहे.



शिंदे गटाच्या मंत्र्यांकडे पक्षाच्या काही खासदारांनी स्नेहभोजनाला जाण्यावरही त्यांनी भाष्य केले. कोणी कुठे जावे हे ज्याचे त्याने ठरवावे. पण ज्यांनी उद्धवजींच्या पाठीत खंजीर खुपसला, त्यांच्या घरी जेवायला जायचे का? हा विचार प्रत्येक खासदाराने स्वतः च्या विवेकाने केला पाहिजे. उद्धवजींचे मन मोठे आहे, ते अशा गोष्टींवरून त्रागा करत नाहीत. पण आपण वागताना आपल्या शिवसैनिकाला काय वाटेल, याचा विचार करणे आवश्यक आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दीड दमडी: एक सिलिंडर की मौत




कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे की, श्रीयुत सिलिंडर यांनी काल रात्री घरातील सर्व लोक गाढ झोपेत असताना स्वतःच्याच पाईपने गळफास लावून घेऊन आत्महत्या केली. मृत सिलिंडरच्या रेग्युलेटरला एक चिठ्ठी अडकवलेली होती. त्या चिठ्ठीत सिलिंडरने, अवहेलना सहन होत नसल्याने मी आत्महत्या करत आहे, असे लिहिले असल्याचे कळते. श्रीयुत सिलिडर हे शांत स्वभावाचे म्हणून प्रसिद्ध होते. त्यांची मूळ प्रकृती जरी पेटण्याची असली तरी ते संयमी होते. कोणी काडी लावल्याशिवाय ते पेटून उठत नसत. मात्र काडी लावल्यावर ते पेटल्याशिवाय राहत नसत. आपली ही भडकण्याची शीघ्रकोपी वृत्ती आटोक्यात राहावी म्हणून त्यांनी स्वतःला रेग्युलेटरही बसवून घेतले होते. ते आपला राग थेट व्यक्त न करता शेगडीद्वारेच व्यक्त करीत असत. अनेकदा तर शेगडीच्या तोंडावर उकळते दूध ओतून त्यांनी आपला राग व्यक्त केला होता. अशावेळी शेगडी आणि सिलिंडर यांच्यात संवाद साधण्याचे काम पाईपने आपल्याकडे ठेवले होते. त्यामुळे सिलिंडरला शेगडीपासून चार हात दूर राहणे शक्य झाले होते व रोजचा संघर्ष टळला होता. परंतु तरीही त्यांच्यातले संबंध कायम ताणलेलेच असायचे. श्रीयुत सिलिंडर यांच्या रेग्युलेटरला अडकवून ठेवलेल्या चिठ्ठीतील मजकुराच्या अनुषंगाने चौकशी केली असता, गेले काही दिवस ते फार अस्वस्थ होते असे कळले. आपला काही एक गुन्हा नसता आपल्यावर बालंट आले, अशी त्यांची भावना झाली होती. त्यांच्या आत्महत्या-प्रकरणी पाईप आणि शेगडी यांना ताब्यात घेण्यात आले असून तिसरा संशयित गॅस मात्र बेपत्ता असल्याने या प्रकरणाचे गूढ आणखी वाढले आहे. गॅसचा शोध लागल्यावरच या प्रकरणातील सत्य बाहेर येईल असे तपासयंत्रणांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या आत्महत्येचे गूढ लवकरात लवकर उकला, असे आदेश पोलिसांना दिले आहेत. ङ्गश्रीयुत सिलिंडर यांची आणि आपली वैयक्तिक ओळख होती आणि त्यांच्या आत्महत्येमुळे आपण अनेकांची पोटे भरणारा एक कौटुंबिक कार्यकर्ता गमावला आहे, असेही ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही सिलिंडर यांच्या सहृदयतेचे दाखले देत त्यांना आदरांजली वाहिली. एकेकाळी त्यांना आपण अनेकदा रिक्षातून नेले आहे, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी, ङ्गमाझा विवाह झाला तेव्हा सिलिंडर यांच्याशी खूप घरोबा होता; पुढे पाईपराव आल्यावर श्रीयुत सिलिंडर यांच्याशी संपर्क कमी झाला, परंतु स्नेह कायम होता अशी प्रतिक्रिया दिली. दरम्यान संजय राऊत यांनी सिलिंडरच्या आत्महत्येला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जबाबदार धरले असून, त्यांनी आपले मित्र डोलांड यांच्याशी चर्चा करून बेपत्ता गॅसचा शोध घ्यावा आणि सिलिंडर यांना किमान मृत्यपश्चात तरी न्याय मिळून द्यावा, असे आवाहन केले आहे. तपासयंत्रणांच्या हाती नेमके काय पुरावे लागले आहेत याची माहिती अद्याप बाहेर आली नसली तरीही या प्रकरणी पाईप यांचा हात असल्याचे कोणतेही पुरावे नसताना त्यांना अटक करण्याच्या कृतीचा पाईप संघटनेतर्फे निषेध करण्यात येत आहे. श्रीयुत सिलिंडर यांच्या आत्महत्येचा सामाजिक अंगाने अभ्यास करत असलेल्या मानसोपचार तज्ज्ञांनी आपले निष्कर्ष जाहीर केले आहेत. गॅस बेपत्ता झाल्यानंतर सगळ्यांनी सिलिंडरची टंचाई असल्याची हाकाटी केली होती. टीव्ही, वृत्तपत्रे, विरोधीपक्षवाले, सामाजिक कार्यकर्ते या सगळ्यांनीच लोकांच्या त्रासाचे खापर गॅसऐवजी सिलिंडरवर फोडले होते. यामुळे श्रीयुत सिलिंडर अस्वस्थ होते आणि त्याचे पर्यवसान त्यांच्या आत्महत्येत झाले असावे, असा निष्कर्ष तज्ज्ञांनी काढला आहे. एकूणच समाजात अलीकडे करणारे भलतेच असतात आणि भरतात मात्र दुसरेच या मुद्द्याकडे लक्ष वेधले जावे म्हणून मी आत्महत्या करीत आहे, असे श्रीयुत सिलिंडर यांनी आपल्या पत्रात म्हटले होते असेही आता उघड झाले आहे. दर काही महिन्यांनी आणि आधीच्या प्रकरणाच्या बातम्या कोणीच दाखवत, छापत नाहीत हे लक्षात आल्यावर दुसरे प्रकरण हाती घेण्याची सवय असलेल्या दमानिया बाईंनी लगोलग सिलिंडरच्या आत्महत्येविषयी पत्रकार परिषद घेतली आणि या प्रकरणाचे धागेदोरे थेट अमेरिकेपर्यंत जात असल्याची कागदपत्रे आपल्याकडे आहेत, असे जाहीर केले. या पत्रकार परिषदेची बातमी डोनाल्ड ट्रम्प यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी तातडीने दोन आठवड्यांची युद्धबंदी जाहीर करुन आपण पाकिस्तानच्या मध्यस्थीने दमानिया यांच्याशी चर्चा करण्यास तयार असल्याचे कळवले आहे. प्रत्यक्षात ट्रम्प यांनी युद्धबंदी जाहीर करण्याचे कारण वेगळेच असून, त्यांनी खरात यांना फोन केल्याचा सीडीआर दमानिया यांच्याकडे असल्याचे कळते. हा सीडीआर दमानिया यांना चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दिला असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. दमानिया यांनी मात्र याचा इन्कार केला असून सीडीआर कसा मिळवता येतो याची माहितीच त्यांनी उघड केली आहे. त्यामुळे अनेक घरांमध्ये - विशेषतः नवऱ्यांमध्ये घबराट पसरलेली आहे. तर दमानिया यांनी लोकांना ङ्गगॅसवरफ ठेवण्यासाठी आपला उपयोग करू नये, अशी मागणी श्री. गॅस यांनी गुप्त ठिकाणाहून प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकात केलेली आहे. दरम्यान बेपत्ता गॅसच्या शोधात गेलेल्या पोलिसपथकांना गॅस सतत गुंगारा देत असून तो डोळ्यांना दिसत नसल्याने आता कुत्र्यांचा वापर करून त्याचा ठावठिकाणा शोधला जाईल, असे जाहीर करण्यात आले आहे. सिलिंडरच्या आत्महत्येमुळे सगळे राजकारण ढवळून निघाले असून, कोसळण्यासाठी नेहमी निमित्ताच्याच शोधात असलेल्या शेअर बाजारानेही त्याचा फायदा घेत लोळण घेतल्याचे समजते. दरम्यान या सर्व प्रकरणावर ङ्गएक सिलिंडर की मौतफ हा चित्रपट करणार असल्याची घोषणा महेश मांजरेकर यांनी केली आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## सामुद्रधुनी, इस्रायलचे हल्ले आणि ऊर्जा संकटामुळे लक्ष चर्चेकडे

# इस्लामाबादमध्ये अमेरिका-इराण शांतता चर्चेची सुरुवात

■ वॉशिंग्टन/इस्लामाबाद

इराण आणि अमेरिका, तसेच इस्रायलदरम्यान युद्धसमाप्तीसाठीच्या वाटाघाटी इस्लामाबादमध्ये शनिवारी सुरू होत आहेत. पण त्या सुरू होण्यासाठी इराणने लेबनॉनमध्ये शस्त्रसंधी आणि इराणच्या गोठवलेल्या मालमत्ता मुक्त करणे, अशा नव्या अटी शुक्रवारी रात्री घातल्या.

वाटाघाटींसाठी या अटींची पूर्तता करावीच लागेल, असा आग्रह इराणच्या पार्लमेंटचे सभापती मोहम्मद बाघेर घालीबाफ यांनी धरला. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स वाटाघाटींसाठी शुक्रवारी इस्लामाबादला रवाना झाले. इस्रायलने शुक्रवारी लेबनॉनवर जोरदार हल्ले केले. मात्र सायंकाळनंतर हे हल्ले थांबले. तरीदेखील शस्त्रसंधीमध्ये लेबनॉनचा समावेश करावा हा इराणचा आग्रह करण्याच्या मनःस्थितीत अमेरिका आणि इस्रायल दिसत नाहीत. आपण लेबनॉनशी थेट चर्चा करू, असे इस्रायलने जाहीर केले असले, तरी लेबनॉनमध्ये इराणसमर्थित हेझबोलाच्या तळांवर प्रहार करण्याचे इस्रायलने थांबवलेले नाही.

होर्मुझच्या नाकेबंदीवरून अमेरिका इराणवर नाराज असल्याचे उपाध्यक्ष व्हान्स आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या दोघांच्या




वक्तव्यावरून स्पष्ट झाले. इराणने चलाखी करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना ते महागात पडेल असा इशारा व्हान्स यांनी दिला. होर्मुझची नाकेबंदी करून वाटाघाटीसाठी मान्य केलेल्या अटींचा भंग इराणकडून होत आहे, हे अजिबात योग्य नाही असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणबरोबर होणाऱ्या चर्चेत ते अमेरिकेची भूमिका पुन्हा मांडतील. होर्मुझची सामुद्रधुनी बंद ठेवणे, इराणचा आण्विक कार्यक्रम आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा कार्यक्रम यांवर अमेरिकेची असलेली मते इराणला मान्य नाहीत. या चर्चेत नेमके काय होणार आहे, याचे तपशील अमेरिकेने दिलेले नाहीत. तसेच, ही चर्चा दोन्ही देशांमध्ये थेट होईल, की अप्रत्यक्ष यावरही भाष्य केलेले नाही.

अमेरिका -इराणमध्ये इस्लामाबादमध्ये शांततेसाठी चर्चा करण्याठी वेगाने पावले पडत असताना होर्मुझची सामुद्रधुनी शुक्रवारी बंदच होती. इस्रायलचे लेबनॉनवर हल्ले सुरू असल्याने इराणने सामुद्रधुनी बंदच ठेवली आहे. इस्रायलचे लेबनॉनवरील हल्ले युद्धविरामाचे उल्लंघन असल्याचे इराणने म्हटले आहे, तर लेबनॉन युद्धविरामाचा भाग नसल्याचे गुरुवारी लेबनॉनबरोबर चर्चेची तयारी दर्शवली आहे आणि हेजबोला गट निःशस्त्र होण्याची मागणी केली आहे. अमेरिका-इराण यांच्यातील चर्चेच्या पार्श्वभूमीवर इस्लामाबादेत चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. पंचतारांकित सेरेना हॉटेलमध्ये चर्चा होणार असल्याने या हॉटेलाल सुरक्षा कर्मचाऱ्यांनी घेराव घातला आहे. हॉटेलच्या सभोवतालचा तीन किलोमीटरचा परिसर पूर्णपणे बंद केला आहे. हॉटेल सरकारी नियंत्रणाखाली ठेवण्यात आले असून, त्या भागाकडे जाणारे रस्ते बंद करण्यात आले आहेत. शहरभर तपासणी नाके उभारून गस्त वाढवण्यात आली आहे.

### आज चर्चेची शक्यता

इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराणचे शिष्टमंडळ दाखल झाले असून शनिवारी सकाळी पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन्ही राष्ट्रांत ऐतिहासिक चर्चा होणार आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक ऊर्जा क्षेत्राला बाधा आल्याने या चर्चेत काय वाटाघाटी होतात याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. व्हान्स यांच्याबरोबर ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जरेड कुशनर हेदेखील आहेत. इराणबरोबर अप्रत्यक्ष वाटाघाटीच्या तीन फेऱ्यांमध्ये कुशनर सहभागी झाले होते.

### ट्रम्प यांची नाराजी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी इराण होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यामध्ये अपेक्षित पावले उचलत नसल्याची खंत व्यक्त केली. इराणबरोबर आमचे असे ठरले नव्हते, अशी टिप्पणी त्यांनी समाजमाध्यमांवर केली. व्हाइट हाऊसच्या प्रवक्त्या ॲना केली म्हणाल्या, 'व्हान्स, विटकॉफ, कुशनर आणि मार्को रुबिओ इराणच्या बाबतीत सतत एकमेकांशी चर्चा करत होते. या दोन आठवड्यांच्या युद्धविरामामध्ये करार होईल, अशी आशा त्यांना आहे.'

---

# आयएसआय'च्या हेरगिरीचे जाळे उद्ध्वस्त; ११ जण अटकेत

## लष्करी तळांवर पाळत ठेवणारे ११ हेर जेरबंद

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

पाकिस्तान आणि त्यांची गुप्तचर यंत्रणा 'इंटर स्व्हिहस इंजिलिजेन्स' (आयएसआय) समर्थित आंतरराज्यीय दहशतवाद, शस्त्रास्त्रे आणि हेरगिरीचे जाळे दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने उद्ध्वस्त केल्याची माहिती अधिकार्यांनी शुक्रवारी दिली. या पथकाने पंजाब आणि राजस्थानमधील संवेदनशील लष्करी स्थळांच्या ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे सीसीटीव्ही कॅमेरे लावून एक गुप्त पाळत ठेवण्याचे जाळेही उघडकीस आणले आहे.

विशेष दोन कारवायांमध्ये ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. याद्वारे प्रतिबंधित संघटना 'बब्बर खालसा इंटरनॅशनल'शी संबंधित असलेल्या मोठ्या कटाचा खुलासा झाला आहे. हे जाळे हेरगिरी, शस्त्रास्त्रांची तस्करी आणि महत्त्वाच्या संरक्षण तळांची रेकी करण्याच्या कामात गुंतले होते, ज्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला होता. आरोपींनी जिथे लष्कर आणि निमलष्करी दलांची मोठी हालचाल असते, अशा मोक्याच्या ठिकाणी किमान नऊ सौरऊर्जेवर चालणारे सिम-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. या ठिकाणांमध्ये पंजाबमधील कपूरथला, जालंधर, पठाणकोट,



पतियाळा आणि मोगा, तसेच हरियाणातील अंबाला, जम्मू-काश्मीरमधील कठुआ आणि राजस्थानमधील बिकानेर व अलवर यांचा समावेश होता, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रमोद सिंह कुशवाह यांनी दिली. हे जाळे पाकिस्तानमधील हस्तकांच्या थेट सूचनेनुसार काम करत होते, जे 'एनक्रिप्टेड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म'द्वारे हेरगिरीच्या क्रियांचे समन्वय साधत होते. संरक्षण ठिकाणांची दृश्ये टिपणे, सैन्याच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सीमेपलीकडे महत्त्वाची माहिती पोहोचवणे ही जबाबदारी या आरोपींवर सोपवण्यात आली होती, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त कुशवाह म्हणाले. पहिल्या कारवाईत पंजाब आणि दिल्लीतून सहा आरोपींना अटक करण्यात आली.

## ठाकरेंच्या खासदारांसोबतच्या बैठकीचे वृत्त निराधार

■ सातारा/वृत्तसंस्था

उद्धव ठाकरे गटाच्या खासदारांसोबत आमची बैठक झाली नसून हे वृत्त पूर्णपणे निराधार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या दरे तर्फ तांब (ता.महाबळेश्वर) या त्यांच्या गावी तीन दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत. दरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा निराधार असल्याचे सांगत माध्यमांमधून केले जात असलेले सर्व दावे फेटाळले. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना शिंदे म्हणाले की, कुठल्यातरी बातम्या करता, त्याची शहानिशा तरी करायला पाहिजे. माझी कोणत्याही खासदारांसोबत बैठक झालेली नाही. मी लपून-छपून कुठल्याही बैठका करत नाही. माझे सगळे उघड काम असते. आम्ही उबाठाच्या खासदारांना भेटलो अशा बातम्या चालवल्या जात आहेत. परंतु, त्यात कोणतेही तथ्य नाही. ती केवळ अफवा आहे. त्यामुळे सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा पद्धतीच्या बातम्या देणे माध्यमांनी टाळले पाहिजे. शहानिशा करून खात्री करूनच माध्यमांनी वस्तुनिष्ठ बातम्या दिल्या पाहिजेत अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. राज्यात 'ऑपरेशन टायगर' राबवून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार फोडण्यासाठी बुधवारी रात्री ठाण्यात एकनाथ शिंदे आणि ठाकरेंच्या खासदारांची गुप्त बैठक पार पडल्याचे वृत्त काही माध्यमातून दाखवले जात होते.

# नितीश यांना राज्यसभेची शपथ

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

बिहारचे पायउतार होणारे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी शुक्रवारी राज्यसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यामुळे बिहारमध्ये मुख्यमंत्री बदलाच्या हालचालींना वेग आला आहे. राज्याचे गृहमंत्री व भाजपचे नेते सम्राट चौधरी तसेच, केंद्रीय मंत्री नित्यानंद राय या दोन नेत्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घातली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जनता दलाचे (संयुक्त) अध्यक्ष नितीश कुमार १४ एप्रिल रोजी बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याने २००५ पासून सुरू झालेले 'नितीशयुग' संपुष्टात येणार आहे. त्याच दिवशी 'एनडीए'च्या विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, नव्या मुख्यमंत्र्याची निवड केली जाणार आहे. १५ एप्रिल रोजी बिहारमध्ये भाजपचा पहिला मुख्यमंत्री पदाची शपथ घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नितीश कुमार यांनी ३० मार्चला बिहारच्या विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. ते पहिल्यांदाच राज्यसभेचे सदस्य बनले असून त्यापूर्वी नितीश कुमार लोकसभेचे खासदारही होते. अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारमध्ये ते मंत्रीही होते.

### हरिवंश पुन्हा उपसभापती?

जनता दलाचे (संयुक्त) नेते हरिवंश राष्ट्रपतीनियुक्त सदस्य म्हणून राज्यसभेचे खासदार बनले आहेत. हरिवंश यांना शुक्रवारी सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी शपथ दिली. हरिवंश नुकतेच वरिष्ठ सभागृहातून निवृत्त झाले असून, त्यांना जनता दलाने राज्यसभेच्या निवडणुकीत बिहारमधून उमेदवारी नाकारली होती. त्यांच्या जागी नितीशकुमार निवडून आले. मात्र, भाजपने हरिवंश यांनी राष्ट्रपतीनियुक्त सदस्य केल्याने ते तिसर्यांदा राज्यसभेचे उपसभापती होऊ शकतात. राष्ट्रपतीनियुक्त सदस्याला राष्ट्रपती निवडणुकीव्यतिरिक्त इतर सर्व संसदीय प्रक्रियेमध्ये सहभागी होता येते. त्यामुळे हरिवंश उपसभापतीचे पदही सांभाळू शकतात.



### मी पूर्वी इथंच तर होतो!

नितीश कुमार यांना राज्यसभेचे सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी संसदेच्या आपल्या दालनामध्ये सदस्यत्वाची शपथ दिली. शपथ घेतल्यानंतर संसदेच्या आवारात पत्रकारांशी संवाद साधताना नितीश कुमार, 'मी पूर्वी इथंच तर होतो', असे म्हणाले.

# आई-वडील 10 तास 'डिजिटल अरेस्ट'; आठवीतल्या मुलाने एका मिनिटात वाचवलं

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

केंद्र सरकार आणि विविध बँकांकडून वारंवार सायबर फसवणूक आणि डिजिटल अरेस्टबाबत विविध माध्यमाद्वारे माहिती दिली जात असते. सायबर चोरटे लोकांना फसविण्याचे नवनवीन मार्ग शोधून काढत असतात. अशा फसवणुकीला बळी पडू नये म्हणून जनजागृती केली जाते. मात्र तरीही अनेकजण बळी पडताना दिसतात. उत्तर प्रदेशच्या बरेलीमधील एका दांपत्याला डिजिटल अरेस्टचा सामना करावा लागला. तब्बल १० तास डिजिटल अटकेत असलेल्या दांपत्याची त्यांच्या आठवीत शिकणाऱ्या मुलाने सुटका केली. या मुलाचे आता कौतुक होत आहे.



ही घटना बरेलीच्या प्रेम नगर परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी शहरातील व्यावसायिक संजय सक्सेना आणि त्यांच्या पत्नीला लक्ष्य केले. नेहमीप्रमाणे तपास यंत्रणांमधून बोलत असल्याचे कारण सांगितले.

चोरट्यांनी सक्सेना यांना दहशतवाद आणि कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराशी तुमचा संबंध आल्याची थाप मारली. तसेच व्हिडीओ कॉलवर खोटे अटक वॉरंटही दाखवले. डिजिटल अटकेच्या बहाण्याने चोरट्यांनी दांपत्याला फोनसमोरच बसून राहण्यास आणि त्यांचे म्हणणे ऐकण्यास भाग पाडले. त्यांच्यावर मानसिक दबावही टाकला.

इतर डिजिटल अटकेत जो प्रकार घडतो, तोच इथेही घडला. दांपत्याला घरातून बाहेर पडण्यास मनाई करण्यात आली. तसेच व्हिडीओ कॉल बंद न करण्याची धमकी दिली. जेवताना, आराम करतानाही व्हिडीओ कॉल सुरुच ठेवावा, असे धमकावण्यात आले. दीर्घकाळ चाललेल्या या डिजिटल अटकेदरम्यान चोरट्यांनी सक्सेना यांच्या बँक खात्याचा तपशीलही त्यांच्याकडून घेतला. जवळपास १० तास हा सर्व प्रकार सुरू होता. या काळात दांपत्ये इतके भेदरले होते की, त्यांनी उलट प्रश्न विचारणेही थांबवले होते. सक्सेना यांचा मुलगा तन्मय आठवीत शिकतो. आपल्या आई-वडिलांना भेदरलेल्या अवस्थेत पाहून त्याला शंका आली. त्याने आई-वडिलांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण घाबरलेल्या पालकांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. अखेर रात्री संधी साधून तन्मयने व्हिडीओ कॉल सुरू असलेला फोन फ्लाइट मोडवर टाकला आणि चोरट्यांशी सुरू असलेला कॉल बंद झाला. तन्मयने वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे महत्त्वाच्या टप्प्यावर चोरट्यांचा संपर्क तोडला गेला.

## सोनू कल्याणकर मृत्यू प्रकरणात ट्विस्ट, तरुणीच्या आईने दिली मारेकऱ्यांना सुपारी

**नांदेड/वृत्तसंस्था**

शिवसेना शिंदे गटाचा कार्यकर्ता सोनू कल्याणकर याच्या खून प्रकरणाच्या तपासात नवनवीन आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहे. प्रेम संबंधातून झालेल्या या खूनामागे तरुणीची आईच मुख्य सूत्रधार असून मारेकऱ्यांना लाखो रुपये दिल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी इंदुबाई मंगनाळे या महिलेला ताब्यात घेतले आहे. खूनाच्या कटात तरुणीची आईच मुख्य सूत्रधार निघाल्याने खळबळ उडाली आहे. सदर महिला आरोपीचा मुलगा हा कुख्यात दहशतवादी रिंदा गँगचा सदस्य असून तो जेलमध्ये आहे. तर पतीला देखील पोलिसांनी खून प्रकरणात अटक केली आहे.सोमवारी (6 एप्रिल) पहाटे 5 वाजेच्या सुमारास मॉर्निंगवॉकला गेलेल्या सोनू कल्याणकर या 35 वर्षीय तरुणाची चार हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने शरीरावर वार करून निर्घृणपणे संपवलं होतं. श्रीनगर भागात मुख्य रस्त्यावर ही घटना घडली. सोनू कल्याणकर हा शिवसेना शिंदे गटाचा कार्यकर्ता होता. दहा ते बारा वर्षापूर्वी त्याचे रिदा गँगचा सदस्य असलेल्या गोलू मंगळनाळे याच्या बहिणीसोबत प्रेमसंबंध होते. ही बाब माहिती झाल्यानंतर मुलीच्या कुटुंबियांनी विरोध केला.कुटुंबीयांनी मुलीचा विवाह दुसऱ्या ठिकाणी ठरविले होता. पण सोनू कल्याणकर याने सोयरीक मोडली.

याचा राग मनात धरून 2021 मध्ये मुलीचा भाऊ गोलू मंगनाळे याने सोनू कल्याणकर याच्यावर गोळीबार केला होता. त्यात तो थोडक्यात बचावला. हे प्रकरण मिटलं अस वाटतं होतं, मात्र 6 एप्रिल रोजी चार हल्लेखोरांनी सोनू कल्याणकर याचा निर्घृणपणे खून केला.पोलिसांनी घटनेच्या काही तासातचं रोहित लोट, पियुष शिंदे, अंकुश गंधनवाड, मधू जोगदंड याला ताब्यात घेतले. सुरुवातीला जुन्या वादातून हा प्रकार घडल्याचं बोललं जातं होतं. त्यानंतर या प्रकरणाला प्रेम संबंधाची किनार लागली. भाग्यनगर पोलिसांनी तरुणीचा भाऊ गोलू मंगनाळे, वडील चंद्रविजय मंगळनाळे यांच्यासह इतर चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

## पेट्रोल पंपावर भरदिवसा महिलेला संपवलं, संभाजीनगरमधील पूजा गवांडे मृत्यू प्रकरणात ट्विस्ट; धक्कादायक कारण समोर

**छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था**

करमाड परिसरातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपावर आज गुरुवारी दुपारच्या सुमारास रक्ताचा सडा पडला. आपल्या संसाराचा गाडा ओढण्यासाठी पंपावर राबणाऱ्या पूजा गवांडे या महिलेची तिचाच दुसरा पती सत्यम गवांडे याने अमानुषपणे हत्या केली. एका बाजूला लग्नानंतर विभक्त राहणारे पती-पत्नी आणि दुसऱ्या बाजूला घटस्फोटासाठी असणारा अट्टाहास, या वादाचा शेवट एका भीषण हत्याकांडात झाला.या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, पूजा यांचा हा दुसरा संसार होता. पहिल्या पतीच्या निधनानंतर त्यांनी काही महिन्यांपूर्वी सत्यमसोबत आळंदीत लग्नाची गाठ बांधली होती. पूजा यांना पहिल्या पतीपासून दोन मुलेही आहेत. मात्र, लग्नानंतर काही दिवसातच या नात्यात दुरावा आला. सत्यमला आता तिसरे लग्न करायचे होते, त्यासाठी तो पूजाकडे घटस्फोटासाठी सतत तगादा लावत होता. मात्र, पूजाने समाजाचा आणि मुलांच्या भविष्याचा विचार करून साथ सोडण्यास नकार दिला. घटस्फोटाला नकार मिळत असल्याने सत्यमच्या डोक्यात सूडाचे चक्र सुरू होते. आज गुरुवारी पूजा पेट्रोल पंपावर आपल्या कामात व्यस्त असताना सत्यम तिथे पोहोचला. काही वेळातच वाद विकोपाला गेला आणि सत्यमने जवळ असलेला धारदार चाकू काढून पूजा यांच्या गळ्यावर भीषण वार केले. वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थित नागरिक सुन्न झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पूजा यांचा जागीच प्राण गेला.चित्तेपिंपळगाव इथं राहणारी पूजा सुदाम गावंडे ही



तरुणी करमाड येथील शिवसमर्थ पेट्रोल पंपावर आपली ड्युटी करत होती. दुपारी १२:३० च्या सुमारास, जेव्हा महामार्गावर मोठी वर्दळ असते, तेव्हा आरोपीने अचानक पूजावर हल्ला चढवला. काही समजण्याच्या आतच त्याने चाकूने तिच्या गळ्यावर वार केले. पूजा रक्ताच्या थारोळ्यात कोसळली आणि तिचा जागीच प्राण गेला.घटनेनंतर पसार झालेल्या आरोपीचा करमाड पोलिसांनी अत्यंत वेगाने शोध घेतला. तांत्रिक माहिती आणि खबर मिळताच पोलिसांनी अवघ्या ६० मिनिटांच्या आत सत्यम गवांडे याला बेड्या ठोकल्या. सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून, हत्येसाठी वापरलेले शस्त्र आणि त्यामागचे सविस्तर कारण याचा तपास पोलीस करत आहेत.

## २५ भाविकांना घेऊन जाणारी बोट यमुना नदीत उलटली; १० ठार



**वृंदावन, वृत्तसंस्था :**

उत्तर प्रदेशातील वृंदावन येथे शुक्रवारी दुपारी मोठा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. केसी घाटावर भाविकांना घेऊन जाणारी एक बोट तरंगत्या पुलाला धडकून यमुना नदीत उलटली. या बोटीत २० ते २५ भाविक होते अशी माहिती समोर आली असून, यापैकी १० जणांचा मृत्यू झाला आहे. अनेकजण अद्याप बेपत्ता असून, मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी पोलीस आणि बचाव पथक दाखल झाले असून,डायव्हर्स बुडालेल्यांचा शोध घेत आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, या बोटीतून अंदाजे २० ते २५ यात्रेकरू प्रवास करत होते. बोट तरंगत्या पुलाला धडकून यमुना नदीत उलटली. पोलीस पथकांनी डायव्हर्सच्या मदतीने काही जणांनी सुखरुप बाहेर काढले तर, १० भाविकांचा मृत्यू झाला आहे. अनेकजण अद्याप बेपत्ता असून, त्यांचा शोध घेतला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बचावलेल्या भाविकांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बोटीचा अपघात झाल्याची माहिती मिळताच, पोलीस आणि बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी त्वरित बचावकार्य सुरू केले. अपघातस्थळी मोठी गर्दी जमल्याने बचावकार्यात अडथळा येत आहे. प्रशासनाने जनतेला शांत राहून बचाव पथकाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी चंद्र प्रकाश सिंह यांनी सहा भाविकांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. बोटीत असणारे सर्व पर्यटक पंजाबचे होते, असेही सिंह यांनी स्पष्ट केले आहे. "सहा मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. आतापर्यंत १६ ते १७ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. बेपत्ता असलेल्यांचा शोध सुरू आहे," असे जिल्हाधिकारी चंद्र प्रकाश सिंह यांनी यांनी सांगितले. समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, यमुनात बुडालेल्या बोटीमध्ये २५ हून अधिक पर्यटक होते असे सांगण्यात येते. राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) यांच्या पथकांसह सुमारे ५० स्थानिक डायव्हर्सच्या मदतीने सध्या यमुना नदीत बचावकार्य सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजस्थानने आरसीबीला नमवत नोंदवला सलग चौथा विजय; पंड्याची मेहनत वाया

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

वैभव सूर्यवंशी व ध्रुव जुरेल या जोडीने मिळून राजस्थान रॉयल्सला स्पर्धेतील सलग चौथा विजय मिळवून दिला आहे. राजस्थानने आरसीबीवर ६ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. आरसीबीने राजस्थानला विजयासाठी २०२ धावांचं लक्ष्य दिलं होतं. वैभव व ध्रुवच्या वादळी अर्धशतकी खेळींच्या बळावर राजस्थानने हे लक्ष्य सहज गाठलं.

आरसीबीने दिलेल्या २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल दुसऱ्या षटकात झेलबाद झाला. पण यानंतर गुवाहाटीत वैभव सूर्यवंशीचं वादळ आलं. वैभवने १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं. तर वैभव व ध्रुव जुरेल यांनी मिळून पॉवरप्लेमध्ये ९७ धावांचा डोंगर उभारला आणि २०२ धावांचं लक्ष्य सहज केलं. वैभव सूर्यवंशी २६ चेंडूत ८ चौकार व ७ षटकारांसह ७८ धावा करत बाद झाला. ध्रुव जुरेल व वैभव सूर्यवंशी यांनी ३७ चेंडूत १०८ धावांची कमालीची भागीदारी रचली. तर ध्रुव जुरेलने दुसऱ्या टोकाकडून अखेरच्या क्षणापर्यंत संघाचा डाव उचलून धरला.







आरसीबीकडून कृणाल पंड्याने सलग २ चेंडूत २ विकेट्स घेत संघाला सामन्यात परत आणलं, पण ध्रुव जुरेल व जडेजाच्या भागीदारीमुळे राजस्थानने विजय नोंदवला. ध्रुव जुरेल ४३ चेंडूत ८ चौकार व ३ षटकारांसह ८१ धावांची खेळी करत नाबाद परतला. तर जडेजाने २४ धावांचं योगदान देत जुरेलला चांगली साथ दिली. यासह राजस्थानने १८ षटकांत २०२ धावा करत विजय नोंदवला.

राजस्थानने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि सामन्यातील पहिल्याच चेंडूवर आर्चरने फिल सॉल्टला झेलबाद केलं. राजस्थानच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर पॉवरप्लेमध्येच ३ विकेट्स घेतले. विराट कोहली १६ चेंडूत ३२ धावा करत बाद जाला. तर देवदत्त पडिक्कलही १४ धावांवर माघारी परतला. यानंतर कर्णधार रजत पाटीदारने ४० चेंडूत ४ चौकार व ४ षटकारांसह ६३ धावांची उत्कृष्ट खेळी केली. ज्यामुळे संघाचा डाव त्याने सावरला. याशिवाय रोमारियो शेफर्डने २२ धावांचं योगदान दिलं.

संघाने झटपट विकेट्स गमावल्याने वेंकटेश अय्यरला या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून मैदानावर खेळण्याची संधी मिळाली. वेंकटेश अय्यरने १५ चेंडूत २ षटकार व एका चौकारासह नाबाद २९ धावा करत संघाला २०१ धावांपर्यंत नेलं. राजस्थानकडून जोफ्रा आर्चर, रवी बिश्नोई व बृजेश शर्मा यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर संदीप शर्मा व रवींद्र जडेजा यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

# वैशालीपुढे आघाडी टिकवण्याचेच आव्हान!

**मुंबई/वृत्तसंस्था**

सायप्रस बेटावर जागतिक विजेतेपदासाठी आव्हानवीर ठरवण्याकरिता सुरू असलेल्या ‘कँडिडेट्स’ बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या आणि महिला विभागात अनुक्रमे उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव आणि भारताची ग्रँडमास्टर रमेशबाबू वैशाली यांनी १० फेऱ्यांनंतर आघाडी घेतली आहे. सिंदारोवने प्रतिस्पर्धांवर तब्बल दोन गुणांची आघाडी घेतली आहे, तर वैशाली अवघ्या अर्ध्या गुणाने चीनच्या झू जिनेर आणि युक्रेनच्या ॲना मुझिचुक यांच्या पुढे आहे. त्यामुळे दर्जेदार खेळ सुरू ठेवत ही आघाडी टिकवण्याचेच आता वैशालीसमोर आव्हान असेल.



भारताचे आशास्थान असलेल्या प्रज्ञानंद आणि दिव्या देशमुख यांचे दहाव्या फेरीतील पराभव त्यांच्या आशांवर पाणी फेरणारे ठरले. तरीही महिला विभागात इतकी चुरस आहे की सलग दोन पराभवानंतरही गुणतालिकेत सातव्या क्रमांकावर असलेल्या दिव्याच्या आशा अजूनही कायम आहेत. मात्र, तिने आपली पराभवाची मालिका खंडित करणे गरजेचे आहे. नागपूरची ही विश्वचषक विजेती ते करण्याची क्षमता निश्चितच बाळगते.

सिंदारोवच्या विजयामागील गणित वेगळेच आहे. सामान्यत: खेळाडू स्पर्धेदरम्यान अनुभवी साहाय्यकांची टीम ठेवतात. मात्र, २० वर्षीय सिंदारोवचे मदतनीस त्याच्याहून लहान असलेले, ग्रँडमास्टर मुखिद्दीन मादामिनोव्ह आणि त्याचा धाकटा भाऊ इसलोमबेक सिंदारोव आहेत. प्रज्ञानंदविरुद्ध नवव्या चालीत चूक केल्यानंतर त्याला विजयासाठी कठोर संघर्ष करावा लागला. “परत गेल्यावर माझ्या प्रशिक्षकांकडून माझी चांगलीच धुलाई होणार,” असे तो डाव संपल्यानंतर म्हणाला.

वैशालीची २०२४च्या ‘कँडिडेट्स’ स्पर्धेतील कामगिरी पाहता ती आता अधिक प्रगल्भ झाल्याचे जाणवते. त्या वेळी पहिले चार डाव गमावल्यानंतर तिने सलग पाच विजय मिळवले होते. मात्र, यावेळी ती परिस्थितीनुसार खेळताना दिसत आहे. दिव्याविरुद्ध आक्रमक खेळणारी वैशाली मुझिचुकविरुद्ध मात्र संयम राखून खेळली. वैशालीला गाठण्यासाठी अनावश्यक धोके पत्करणाऱ्या झू जिनेरला बिबिसाराने पराभूत केले. दोघींमधील गेले पाच डाव बिबिसाराने जिंकले आहेत, त्यामुळे झूचा हा निर्णय आत्मघातकी ठरला असे म्हणावे लागेल. सिंदारोव स्वत:च्या चुका मान्य करत असताना स्पर्धेतील अव्वल मानांकित हिकारू नाकामुरा मात्र आपल्या प्रशिक्षकांवर दोष टाकताना दिसला. नवव्या फेरीत पहिला विजय मिळवल्यानंतर त्याने प्रक्षोभक प्रतिक्रिया दिली. “मला बुद्धिबळ खेळता येत नाही असे मानणाऱ्यांसाठी हे उत्तर आहे,” असे तो म्हणाला.

# आयुष शेट्टीची स्वप्नवत घोडदौड... क्रिस्टीला धक्का देत उपांत्य फेरीत प्रवेश

**निंगबो (चीन)/वृत्तसंस्था**



भारताच्या आयुष शेट्टीने कारकीर्दीतील सर्वांत मोठ्या विजयाची नोंद करताना शुक्रवारी आशियाई अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. आयुषने जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या, पण स्पर्धेत तिसरे मानांकन मिळालेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीला पराभवाचा धक्का दिला.

जागतिक क्रमवारीत २५व्या क्रमांकावर असलेल्या आयुषने अष्टपैलू खेळ आणि जोरदार स्मॅशच्या जोरावर उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत २३-२१, २१-१७ असा विजय मिळवला. उपांत्य फेरीत आयुषची अग्रमानांकित थायलंडच्या कुनलावत वितिदसर्नशी गाठ पडेल. वितिदसर्न पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेता आहे.

उपांत्यपूर्व लढतीत पहिल्या गेमच्या सुरुवातीला आयुषने २-० आणि ५-३ अशी आघाडी घेतली होती. परंतु नंतर जोनाथनने आयुषला ‘बॅकलाईन’वर रोखले. गेमच्या अखेरच्या टप्प्यात जोनाथन १८-१६ अशी आघाडी राखून होता. या स्थितीत आयुषने जोरकस प्रतिकार करत १८-१८ अशी बरोबरी साधली. मात्र, एक फटका बाहेर गेल्याने जोनाथनला दोन ‘गेम पॉइंट्स’ मिळाले. यातील एक पॉइंट जोनाथनने मिळवला. मात्र, नंतर जोनाथनकडून चुका झाल्या आणि आयुषने पहिला गेम अखेरच्या क्षणी जिंकला. आयुषने दुसर्या गेममध्ये अधिक आक्रमकता दाखवली आणि जोनाथनला निष्प्रभ केले.

# वैभव सूर्यवंशीने अवघ्या इतक्या चेंडूत झळकावलं तिसरं सर्वात जलद अर्धशतक

**गुवाहाटी/वृत्तसंस्था**

वैभव सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएलमधील आपला वादळी फॉर्म कायम ठेवला आहे. राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात वैभव सूर्यवंशी इम्पॅक्ट प्लेअर म्हणून दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरला आणि त्याने आपल्या वादळी फटकेबाजीच्या बळावर १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं. आयपीएल इतिहासातील हे दुसरं सर्वात जलद अर्धशतक आहे.

आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना दिलेल्या २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सला वैभव सूर्यवंशीला दणक्यात सुरूवात करून दिली. वैभवने जसप्रीत बुमराहनंतर आता या सामन्यात जोश



हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमारसारख्या मोठ्या गोलंदाजांविरूद्ध चौकार आणि षटकारांचा वर्षाव केला. त्याने जोश हेझलवूडच्या सलग चार चेंडूंवर चार चौकार लगावत १८ धावा कुटल्या आणि अवघ्या १५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केलं. वैभव सूर्यवंशीने पॉवरप्लेमध्येच १५ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. त्याने १५ चेंडूत ५ चौकार ४ षटकारांसह त्याने अर्धशतक पूर्ण केलं. यासह राजस्थान रॉयल्सने पॉवरप्लेमध्ये १ विकेट गमावत ९७ धावांचा डोंगर उभारला. वैभव सूर्यवंशीच्या साथीने ध्रुव जुरेलने देखील वादळी फटकेबाजी करत आरसीबीच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली आहे. वैभवने भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर एक शानदार स्ट्रेट ड्राईव्ह मारून आपल्या डावाची सुरुवात केली. डावाच्या दुसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल बाद झाला, पण त्याचा वैभव सूर्यवंशीवर काही परिणाम झाला नाही. त्याने दुसऱ्या टोकावरून आपली प्रभावी फलंदाजी सुरू ठेवत जोश हेझलवूडच्या एकाच षटकात १८ धावा केल्या. पुढच्या षटकात त्याने भुवनेश्वरच्या गोलंदाजीवर मोठे फटके खेळले. वैभवने या षटकात दोन षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने १६ धावा केल्या. सर्वात जलद अर्धशतक करण्याच्या विक्रमात वैभवने आता आयपीएलमध्ये संयुक्तपणे तिसरं स्थान पटकावलं आहे. भारतीय फलंदाजांमध्ये सर्वात जलद आयपीएल अर्धशतकाचा विक्रम यशस्वी जैस्वालच्या नावावर आहे. त्याने २०२३ मध्ये केकेआरविरुद्ध अवघ्या १३ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले होते.

केएल राहुल दुसऱ्या स्थानावर आहे. त्याने २०१८ मध्ये पंजाब किंग्सकडून खेळताना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध १४ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावलं होतं. युसूफ पठाणने २०१४ मध्ये हैदराबादविरुद्ध आणि वैभवने या आयपीएलमध्ये दोनदा १५ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केलं आहे.

# सिव्हिल इंजिनिअर ठरला सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक, अरिजित सिंगला मागे टाकत फहीम अब्दुल्लाने मारली बाजी

मुंबईत रविवारी संध्याकाळी पार पडलेल्या 'चेतक स्क्रीन अवॉईस २०२६' मध्ये, फहीम अब्दुल्ला याला 'सैयारा' चित्रपटाच्या शीर्षक गीतासाठी 'सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक' हा पुरस्कार मिळाला. फहीम हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी स्वतः उपस्थित राहू शकला नाही, त्यामुळे चित्रपटाचे दिग्दर्शक मोहित सुरी यांनी त्याच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी मोहित सुरी यांनी फहीमच्या संघर्षाचा प्रवास सांगितला. या चित्रपटाच्या यशानंतर त्याचं आयुष्य कसं बदललं, ते सर्वांना सांगितलं.



पुरस्कार सोहळ्यात बोलताना मोहित म्हणाला, फहीमला गायक बनायचं होतं, तरीही त्याने परीक्षा देणं कधीच सोडलं नाही. या स्पर्धात्मक क्षेत्रात यश मिळेल की नाही, याची त्याला खात्री नव्हती. "जेव्हा मी फहीमला भेटलो, तेव्हा तो वारंवार परीक्षा देत होता. मी त्याला विचारायचो की, 'तू या परीक्षा कशासाठी देतोयस?' त्यावर तो म्हणाला, 'माझ्या करिअरचे पुढे काय होईल आणि मला यश मिळेल की नाही, हे मला माहीत नाही.' या चित्रपटात काम मिळण्यापूर्वी फहीम आणि अर्सलान निजामी 'अटल सेतू'वर काम करत होते. आज मिळालेल्या या पुरस्काराने हे सिद्ध केलंय की, तुला आता त्या नोकरीची गरज नाही. तू या इंडस्ट्रीत नक्कीच यशस्वी होणार आहेस," असं मोहित सुरी म्हणाला.

'सैयारा'च्या शीर्षक गीताचा सह-संगीतकार अर्सलान निजामी हा एक सिव्हिल इंजिनिअर आहे, त्याने संगीताच्या आवडीसाठी आपली नोकरी सोडली. फहीम अब्दुल्ला हा मूळचा श्रीनगर, काश्मीर येथील एक अष्टपैलू कलाकार आहे. तनिष्क बागची आणि अर्सलान निजामी यांनी या गाण्याचं संगीत दिलं आहे, तर फहीमने या सुपरहिट गाण्याला आपला आवाज दिला आहे. फहीमने या श्रेणीतील अनेक नामवंत गायकांना मागे टाकत करून हा पुरस्कार मिळवला. या पुरस्कारासाठी 'धुरंधर'च्या शीर्षक गीतासाठी हनुमानकाईंड, सुधीर यदुवंशी, शाश्वत सचदेव आणि मोहम्मद सादिक यांना नामांकन मिळालं होतं. तसेच, 'धुरंधर'मधील 'गेहरा हुआ' या गाण्यासाठी अरिजित सिंग, शाश्वत सचदेव आणि अरमान खान यांना नामांकन मिळालं होतं. 'सैयारा'मधील 'धून' गाण्यासाठी अरिजित सिंग आणि 'बरबाद' गाण्यासाठी जुबिन नौटियाल यांनाही नामांकन मिळालं होतं. 'चेतक स्क्रीन अवॉईस' देशातील अत्यंत विश्वासार्ह चित्रपट पुरस्कारांपैकी एक मानले जातात. या पुरस्कारांसाठी नामांकन आणि विजेत्यांची निवड 'स्क्रीन अकादमी' द्वारे करण्यात आली. ही एक स्वतंत्र आणि नफा न मिळवणारी संस्था असून, यामध्ये ५३ चित्रपट निर्माते, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. या सोहळ्याचे सूत्रसंचालन झाकीर खान, सुनील ग्रोव्हर व आलिया भट्ट यांच्याबरोबर इंडियन एक्सप्रेस हिंदीचे एडिटर सौरभ द्विवेदी यांनी केले.

# जया बच्चन यांची कथा अन् एका रात्रीत बदलले अमिताभ यांचे नशीब

बॉलिवूडमध्ये अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांची जोडी म्हणजे सुवर्णकाळाची आठवण. मात्र एक काळ असा होता, जेव्हा अमिताभ बच्चन यांच्या कारकिर्दीत चढ-उतार सुरू होते आणि त्यांना एका मोठ्या हिटची गरज होती. अशा वेळी जया बच्चन यांनी उचललेलं एक पाऊल त्यांच्या करिअरसाठी टर्निंग पॉइंट ठरलं.1988 साली प्रदर्शित झालेल्या 'शहंशाह' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठा धमाका केला. विशेष म्हणजे, या चित्रपटाची कथा जया बच्चन यांनी लिहिली होती.सुमारे 2 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने जवळपास 12 कोटी रुपयांची कमाई केली. जी त्या काळात मोठी हिट मानली जात होती. या चित्रपटात अमिताभ बच्चन दुहेरी भूमिकेत दिसले. एकीकडे ते प्रामाणिक पोलीस अधिकारी होते तर दुसरीकडे 'शहंशाह' बनून गुन्हेगारांविरुद्ध लढणारा दमदार नायक. चित्रपटातील त्यांचा प्रसिद्ध डायलॉग रिश्ते में तो हम तुम्हारे बाप लगते हैं... आजही लोकांच्या ओठांवर आहे.

1980च्या दशकात नवीन कलाकार इंडस्ट्रीत येत असताना अमिताभ बच्चन यांना एका मोठ्या यशाची गरज होती. ही उणीव या चित्रपटाने भरून काढली आणि त्यांना पुन्हा 'महानायक' म्हणून स्थिर केलं. जया बच्चन यांनी लिहिलेल्या कथेत एक असा नायक दाखवण्यात आला, जो दिवसा पोलीस अधिकारी असतो, पण रात्री 'शहंशाह' बनून अन्यायाविरुद्ध लढतो. या कथेत ॲक्शन, ड्रामा आणि सामाजिक संदेश यांचा उत्तम संगम होता. त्यामुळे हा चित्रपट फक्त मनोरंजनापुरता मर्यादित राहिला नाही तर प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवणारा ठरला.या चित्रपटातील गाणीही प्रचंड लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांचं 'अंधेरी रातों में...' आणि लता मंगेशकर यांचं 'जाने दे मुझे जाना है' ही गाणी आजही आवडीने ऐकली जातात. चित्रपटात मीनाक्षी शेषाद्री आणि अमरीश पुरी यांसारखे दिग्गज कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. हा चित्रपट केवळ अमिताभ बच्चन यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा नाही, तर जया बच्चन यांच्या लेखनकौशल्याचाही उत्तम नमुना आहे.

# शेवटचा स्वीकार करायलाच हवा..., अर्जुन कपूर याच्याबद्दल मोठी अपडेट, चाहत्यांना सतावतेय चिंता



अभिनेता अर्जुन कपूर त्याच्या प्रोफेशनल आयुष्यामुळेल कमी पण खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत असतो. आता देखील एका मोठ्या कारणामुळे अभिनेता चर्चेत आला आहे. अर्जुन याच्या आयुष्यातील एका मोठ्या अध्यायाचा अंत झाला आहे का? अभिनेत्याने पोस्ट केलेल्या इन्स्टाग्राम पोस्टमुळे सर्वत्र चर्चांना उधाण आलं आहे... अभिनेत्याने अशी पोस्ट का शेअर केली... असाच प्रश्न आता सर्वत्र उपलब्ध होत आहे. अभिनेत्याच्या पोस्टमुळे चाहत्यांची चिंता देखील वाढली आहे... शिवाय अनेकांनी अभिनेत्याला नेमकं झालं तरी काय असा प्रश्न देखील विचारलेला आहे.सांगायचं झालं तर, खरं तर, 9 एप्रिल 2026 रोजी, अर्जुन कपूरने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक गूढ आणि रहस्यमय पोस्ट शेअर केली, ज्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे. आपल्या पोस्टमध्ये अर्जुनने लिहिले, "गोष्टी तुमच्या मनासारख्या संपल्या नाहीत तरीही, तुम्ही शेवट स्वीकारला पाहिजे." त्याने ही पोस्ट का केली आहे की नाही हे उघड केले नाही, परंतु सोशल मीडियावर लोकांनी अभिनेत्यासोबत सर्व काही ठीक आहे की नाही याबद्दल तर्कवितर्क सुरू केले आहेत.अर्जुन कपूरने पोस्ट शेअर केल्यानंतर लगेचच, नेटकऱ्यांनी त्याच्या स्टोरीवर तर्कवितर्क सुरू केले आणि चाहत्यांना अभिनेत्याची काळजी वाटू लागली. अभिनेत्याच्या पोस्टमुळे रेडिटवर बरीच चर्चा होत आहे. अर्जुनच्या पोस्टचा स्क्रीनशॉट पोस्ट करत एका युझरने लिहिले, "मला खरंच आशा आहे की अर्जुन ठीक असेल. आधी त्याच्या आईच्या वाढदिवसाची ती पोस्ट, आणि आता हे..." पोस्टवर कमेंट करत अन्य एक नेटकरी म्हणाला, 'मला असं वाटतं की, तो डिप्रेशनमध्ये... ', रोहित शेट्टीच्या सिनेमामुळे त्याच्या करिअरला चालना मिळाली, पण आता तो बेरोजगार दिसतोय. त्याचे त्याच्या बहिणीसोबतही काही भांडण झाले आहे का?' दुसऱ्या एकाने लिहिले, 'मला फक्त आशा आहे की अर्जुन ही टॉक्सिक फिल्म इंडस्ट्री सोडून देईल, कारण त्याला इथे फक्त द्वेषच मिळाला आहे. त्याने या झगमगाटापासून दूर, दुसऱ्या कशावर तरी लक्ष केंद्रित केलं पाहिजे.' अर्जुन कपूरच्या पोस्टवर अशाच प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.

***

# 'नॅशनल क्रशच्या टॅगमुळे माझ्या जाहिरातींची कामं गेली : गिरीजा ओक



गिरिजा ओकचे फोटो काही दिवसांपूर्वी प्रचंड व्हायरल झाले होते. ज्यामुळेच तिला 'नॅशनल क्रश' हा टॅगसुद्धा मिळाला. ज्यानंतर ती देशभरात नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाऊ लागली. अशातच आता अभिनेत्रीने याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. अनेकांना तिच्या या टॅगमुळे तिला खूप फायदा झाला असेल, खूप कामं मिळाली असतील वाटत होतं. पण, खरंतर याउलट झालं आहे. गिरिजाने नॅशनल क्रश या टॅगमुळे कामं गेल्याचं म्हटलं आहे.

गिरिजा ओक सोशल मीडियावर तशी सक्रिय असायची. त्यामुळे तिचे फॉलोअर्स आधीसुद्धा होते. परंतु, नॅशनल क्रश म्हणून व्हायरल झाल्यानंतर तिचे फॉलोअर्स वाढल्याचंही तिने सांगितलं आहे. नुकतीच गिरिजाने अतुल परचुरे यांना मुलाखत दिली आहे. ज्यामध्ये तिने नॅशनल क्रश झाल्यानंतरचा अनुभव, त्याचे फायदे आणि तोटे सांगितले आहेत. गिरिजा नेमकं काय म्हणाली याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात...

नॅशनल क्रशच्या टॅगमुळे माझ्या जाहिरातींची कामं गेली.

गिरिजाने आतापर्यंत जाहिराती, नाटक, चित्रपट, रिॲलिटी शो अशा विविध माध्यमांमध्ये काम केलं आहे. यावेळी मुलाखतीत तिला जाहिरातींबद्दल विचारल्यानंतर ती म्हणाली, "जाहिराती आता कमी झाल्या आहेत. शंभरच्या वर जाहिराती केल्या आहेत. पण, आता जरा कमी झाल्या आहेत. जाहिरातींमध्ये जे लोक फार नवीन नसतात पण, फार प्रसिद्धसुद्धा नसतात ना त्यांना खूप जाहिराती मिळतात. अचानक तुम्हाला खूप लोक ओळखू लागले की तुम्ही ती घरातील सामान्य स्त्री वाटत नाही. या नॅशनल क्रशच्या टॅगमुळे माझ्या जाहिरातींची कामं गेली. आता मला जाहिराती फार मिळत नाहीये. म्हणजे असं फार काही विचारणा होत नाहीये".

नॅशनल क्रशमुळे तुझ्या हाती काय लागलं असं विचारल्यानंतर गिरिजी म्हणाली, "फॉलोअर्स मिळाले मला. ती गोष्ट हाती लागली." गिरिजी पुढे या अनुभवाबद्दल म्हणाली, "काय हाती लागलं म्हणण्यापेक्षा मजेदार अनुभव होता. याबद्दल एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे याकडे फार लक्ष दिलं तर लोक म्हणतात आली मोठी, आता डोक्यावर बसेल, झाडावर चढली आणि जर त्याला फार महत्त्व नाही दिलं तर असं कसं तुझी मेहनत आहे तू श्रेय घेतलं पाहिजे असंही म्हणतात. पण, यामुळे मी बऱ्यापैकी अमराठी प्रेक्षकांपर्यंत पोहोचले. ज्यांनी माझे चित्रपट पाहिले नव्हते किंवा जे मला ओळखत नव्हते त्यांनी माझे जुने चित्रपट पाहिले. याचा मला आनंदच आहे".

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

जनसंचलन/ बुलढाणा

माझे गाव आरोग्य संपन्न गावफ्फ अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा व आढावा सभा येथील वैद्यकीय महाविद्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती वाढविणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी आरसीएच कार्यक्रमांतर्गत एचपीव्ही () लसीकरणाचा तालुकानिहाय आढावा घेत उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेत संबंधित कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी रणजीत मंडाले यांनी विविध आरोग्य कार्यक्रम व जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागात सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे आणि यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच कमी प्रगती असलेल्या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. डब्ल्यूएचओचे डॉ. सम्यक खौरे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन केले. बैठकीत तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी अभियानाशी संबंधित कामकाजाबाबत सादरीकरण केले. या प्रसंगी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चौहान, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धुतडमल, अनिल लोखंडे व सुनील लोखंडे उपस्थित होते.

# खाजगी नोकरी इच्छुकांसाठी सुवर्णसंधी; बुलढाण्यात १३ एप्रिलला प्लेसमेंट ड्राइव्ह

जनसंचलन/ बुलढाणा




बुलढाणा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध झाली असून, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (), खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गपंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्हफ्चे आयोजन करण्यात आले आहे. ही प्लेसमेंट ड्राइव्ह सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (), नांदुरा, जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. या मेळाव्यात चिरायु पॉवर (खामगाव), क्रेडिट ॲक्सीस ग्रामीण (नांदुरा) आणि क्वीज कॉर्प (पुणे) यांसारख्या नामांकित कंपन्या सहभागी होणार असून विविध रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी देखील उपलब्ध होणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय तसेच पदवीधर पुरुष व महिला उमेदवारांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी मिळणार आहे. उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी व संबंधित कंपनी प्रतिनिधींसमवेत मुलाखत द्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथील दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२६४२ वर संपर्क साधावा.

# खामगाव एमआयडीसीत एलपीजी गॅस गळतीचे महा-मॉकड्रिल यशस्वी

## जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती सज्जतेची मोठी चाचणी...

जनसंचलन/ बुलढाणा

औद्योगिक क्षेत्रात अचानक उद्भवणाऱ्या भीषण रासायनिक आपत्तींना तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि औद्योगिक वसाहती किती सज्ज आहेत, याची प्रत्यक्ष प्रचिती आज खामगाव येथे आली. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार आणि निवासी जिल्हाधिकारी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ङ्गवन एशिया नेटवर्क इंडिया प्रा. लि.फ, एमआयडीसी, खामगाव येथे एलपीजी गॅस टँकर गळती संदर्भात एक भव्य मॉकड्रिलफ (रंगीत तालीम) यशस्वीरित्या पार पडले. आज दुपारी ११:३० वाजता कंपनीच्या टँकर लोडिंग परिसरात गॅस गळती झाल्याचा काल्पनिक प्रसंग निर्माण करण्यात आला. गळती लक्षात येताच कंपनी व्यवस्थापनाने तातडीने जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला. या माहितीच्या आधारे जिल्हा प्रशासनाची यंत्रणा अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल होऊन कार्यान्वित झाली. या संपूर्ण मोहिमेचे संचलन व समन्वय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अमर पुरुषोत्तम भोगे यांनी केले. अग्निशमन दलाचे अग्निशमन अधिकारी नागेश रोठे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने वॉटर कर्टन तयार करून हवेतील गॅस विरळ केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरेंद्र अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात तातडीने नाकेबंदी करण्यात आली. संभाव्य अग्निभय टाळण्यासाठी महावितरणने परिसराचा वीजपुरवठा त्वरित खंडित केला. कंपनीच्या आपत्कालीन आराखड्यानुसार सायरन वाजवून कर्मचाऱ्यांचे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले. या सरावाचे तांत्रिक निरीक्षण करण्यासाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अमर पुरुषोत्तम भोगे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गजानन प्रल्हाद घिरके, खामगावच्या नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, महावितरणचे सहाय्यक अभियंता सचिन फेरण, तसेच वन एशिया नेटवर्कचे जी.एम. राजेश सिन्हा उपस्थित होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य गुलाबसिंग राजपूत आणि प्रदिप सोनवणे यांनीही मोहिमेत सक्रिय भूमिका बजावली. मॉकड्रिलचा उद्देश : औद्योगिक क्षेत्रात एलपीजी गॅस गळतीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास, विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वय आणि त्यांचा रिस्पॉन्स टाइम (प्रतिसाद वेळ) तपासणे हा या सरावाचा मुख्य उद्देश होता. प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी गोंधळ उडू नये आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून जीवित व वित्तहानी कशी टाळावी, याचे यशस्वी प्रशिक्षण या निमित्ताने देण्यात आले.


या यशस्वी सरावामुळे खामगाव औद्योगिक परिसरातील सुरक्षिततेचा आत्मविश्वास वाढला असून, जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. मोहिमेच्या सांगतेनंतर वन एशिया नेटवर्कच्या वतीने सर्व सहभागी यंत्रणांचे आभार मानण्यात आले.

# संभाजी बिग्रेड चे तालुका अध्यक्ष राहुल संभारे तसेच जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुनील संबारे यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश...

जनसंचलन/मलकापुर

मलकापूर तालुक्यात राजकीय दृष्टीने महत्वाचे असणारी घटना म्हणजे संभाजी बिग्रेड चे तालुकाध्यक्ष राहुल संबारे तसेच संभाजी बिग्रेड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुनील संबारे यांनी मलकापूर विधानसभा मतदार संघांचे माजी आमदार राजेश एकडे यांच्या मार्गदर्शनात आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. अरविंदजी कोलते यांच्या हस्ते बुलढाणा जिल्हा किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष संभाजी शिर्के यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला. या प्रवेशानंतर बोलत असताना संभाजी शिर्के यांच्या युवा नेतृत्वात आम्हाला कार्य करायचे असून काँग्रेस पक्षाची विचार धारा तरुणांना समजावून सांगत पक्षाला मजबुती देण्याचे काम येत्या काही दिवसात करायचा मानस यावेळी दोंघांनी सुद्धा बोलून दाखविला यांच्या प्रवेशामुळे निश्चित कॉग्रेस पक्षात युवकांचे संघटन वाढेल तसेच ग्रामीण पक्ष आणखी मजबूत होईल यात शंका नाही.

या पक्ष प्रवेशाच्या वेळी तालुकाध्यक्ष अनिल भारंबे, सचिन तायडे, रतन इंगळे, सुपडा ब्राम्हणे हे उपस्थित होते



# आमदार नव्हे, सेवेकरीफसिद्ध! कुटे यांच्या कृतीने जिंकली मने...

## २ हजार वऱ्हाडींच्या साक्षीने पार पडला थाटामाटात विवाह



**जनसंचलन/ सोनाळा**

समाजकारणाला प्राधान्य देत आमदार नव्हे, सेवेकरीफ्फ ही भावना जपणारे आ. डॉ. संजय कुटे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. पितृछत्र हरवलेल्या पल्लवी या मुलीचे त्यांनी सहपत्नीक कन्यादान करत मानवतेचा अनोखा आदर्श घालून दिला. संत नगरी काटेल येथे १० एप्रिल रोजी तब्बल २ हजार वऱ्हाडींच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा दिमाखात पार पडला. पल्लवीचे वडील दिलीपराव काळमेघ यांचे काही महिन्यांपूर्वी निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या या कुटुंबाला डॉ. कुटे व डॉ. अपर्णाताई कुटे यांनी आधार देत पल्लवीला दत्तक घेतले. केवळ दत्तकच नव्हे, तर तिच्या विवाहाची संपूर्ण जबाबदारी उचलून त्यांनी पित्याची उणीव भरून काढली. विवाह सोहळ्यात भावनिक क्षणांचा संगम पाहायला मिळाला. एका बाजूला वडिलांच्या आठवणींचे दुःख, तर दुसरीकडे नवजीवनाची सुरुवात अशा वातावरणात उपस्थितांनी वधू-वरांना आशीर्वाद दिले. कुटे दाम्पत्याच्या या कार्यामुळे जळगाव जामोद मतदारसंघात माणुसकीचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित झाला आहे.

# प्रतापराव जाधव यांचे मुख्यमंत्र्यांना थेट पत्र! शिक्षिका पत्नी हत्या प्रकरणात मोठे षडयंत्र उघडकीस येण्याची शक्यता...

## शिक्षिका खून प्रकरणात नवीन संशयितांवर कारवाई न झाल्याने संताप वाढला!

**जनसंचलन/बुलढाणा**

संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा येथील शिक्षिका वृषाली गावंडे यांच्या मृत्यूने संपूर्ण जिल्हा हादरला असून, हा अपघात नसून थेट सुपारी देऊन केलेला खून असल्याचे उघड झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. २ मार्च २०२६ रोजी शाळेत जात असताना झालेल्या अपघातात वृषाली यांचा मृत्यू झाला होता. मात्र तपासात धक्कादायक सत्य समोर आलेस्वतः पतीनेच तीन लाखांची सुपारी देऊन पत्नीचा काटा काढल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात पती प्रकाश गावंडे, त्याचा मित्र आणि वाहनचालक अशा तिघांना अटक करण्यात आली असली तरी, इतर संशयित अजूनही मोकाट असल्याने पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. काही आरोपींना पोलिसांचे अभय आहे का? असा थेट सवाल उपस्थित करत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री यांना पत्र लिहून संपूर्ण तपास कडे सोपवण्याची जोरदार मागणी केली आहे. इतकेच नव्हे तर हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी नामांकित सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेज आणि कॉल रेकॉर्डच्या आधारे पोलिसांनी आरोपींपर्यंत धागेदोरे पोहोचवले असले तरी संपूर्ण कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा उलगडा



अद्याप झालेला नाही. त्यामुळेच जिल्ह्यात पोलिसांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून, सत्य बाहेर आणण्यासाठी सीबीआय चौकशीच हवी अशी मागणी जोर धरत आहे. पत्नीच्या विश्वासाला तडा देत पैशासाठी केलेल्या या थरारक कटामुळे बुलढाणा हादरला असून, आता या प्रकरणात न्याय मिळतो की नाही, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मोताळा बाजारात कंत्राटदारांचा उघड दरोडा?

## ठेका संपूनही अवैध वसुली; फौजदारी कारवाईची मागणी!

**जनसंचलन/मोताळा**

नगरपंचायत हद्दीतील आठवडी बाजारात ठेका संपल्यानंतरही कंत्राटदारांकडून सुरू असलेल्या अवैध वसुलीचा प्रकार उघडकीस आला असून शहरात संतापाची लाट उसळली आहे. ॲड. रहीम शाह यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देत संबंधितांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसाठी दिलेला लिलाव ठेका संपल्यानंतरही ९ एप्रिल रोजी बाजारात व्यापाऱ्यांकडून जबरदस्तीने वसुली करण्यात आली. ठरावातील शुल्कापेक्षा जास्त रक्कम उकळून व्यापाऱ्यांची सरळ लूट सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे शासनाच्या महसुलालाही फटका बसत असल्याचे नमूद करण्यात आले. दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) नेते रमेश धुनके यांनी कंत्राटदारांना जाब विचारतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून प्रकरण अधिकच तापले आहे. संबंधित कंत्राटदारावर भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये फसवणूक, विश्वासघात व जबरदस्तीने वसुलीचे गुन्हे दाखल करावेत, तसेच त्यांना ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# दगडवाडी (ता. देऊळगावराजा) येथे भीषण आग लाखोंचे नुकसान, ७ जखमी; मोठा अनर्थ टळला...



**जनसंचलन/देऊळगावराजा**

दगडवाडी येथे शुक्रवार, १० एप्रिलच्या मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे एका घराला अचानक भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. शेजारील नागरिक सौंदा उगलमुगले यांनी धूर आणि ज्वाळा दिसताच तत्काळ गावकऱ्यांना सतर्क केले. सरपंच पती यांनी तातडीने पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी यांच्याशी संपर्क साधून अग्निशामक दलाला पाचारण केले. अवघ्या १५ ते २० मिनिटांत अग्निशामक गाडी घटनास्थळी दाखल झाली. दरम्यान, गावकऱ्यांनी सुरुवातीला बादल्या व पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र याच वेळी घरातील गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात घरावरील पत्रे व मोठमोठे दगड दूरवर फेकले गेले, ज्यामुळे मदत करणाऱ्या नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला. या घटनेत आर्यन शंकर घुगे याला डोक्याला गंभीर दुखापत होऊन १८ टाके पडले, तर इतर सहा जण किरकोळ जखमी झाले. घरातील धान्य, कागदपत्रे, कपडे व इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अग्निशामक दल आणि पोलिसांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे आग आटोक्यात आली व पुढील मोठा अनर्थ टळला. घर मालक कारभारी दिपाजी नागरे यांचे घर पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. गावात या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८